ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT

Golden Research Thoughts

मानव संसाधन विकासाच्या दृष्टीकोनातून स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमावरील प्रभाव — एक विश्लेषण

डॉ. वसुधा विनोद देव
सहयोगी प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

प्रस्तावना :—
प्रस्तुत संशोधनामध्ये मानव संसाधन विकासाच्या दृष्टीकोनातून स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमावरील प्रभाव पडताळण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये, बी.एड., डी.टी.एड., जेष्ठ शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी, चिन्मय मिशनमधील आचार्य व शिक्षण तज्ज्ञ यांचा समावेश करण्यात आलेला आहे. संशोधनाचे साधन म्हणून मतावली या साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच संशोधनासाठी गुणात्मक सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनाच्या संदर्भात सांख्यिकीय विश्लेषणावरून स्पष्ट होते की, आधुनिक शिक्षण प्रणालीवर स्वामी चिन्मयानंदांच्या विचारांचा व संलक्पनाचा पगडा आढळतो. तसेच स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यात मानव संसाधन विकासास आवश्यक घटक अभिव्यक्त होतात.

बीजशब्द — मान संसाधन

प्रस्तावना :
शिक्षण ही मानवी जीवनातील एक आवश्यक गोष्ट आहे. शाळा, विद्यापीठे, यांच्या मार्फत विद्यार्थ्यांवर जी प्रक्रिया घडते ती म्हणजे शिक्षण. परंतु आजची शिक्षण पध्दती प्रचंड चुरशीची आणि स्वर्धातमक झाली आहे. एक सुरी अभ्यास, प्रत्येकालाच मेडिकलला जाण्याची धावपळ, कारण त्या खालची कोणतीही पदवी खालच्या दर्जाची मानली जावी बहुदा, त्याचप्रमाणे परदेशात जावून विशिष्ट शिक्षण पू२र्ण करायच म्हणून भयंकर रेसमध्ये असलेले विद्यार्थी व त्यामागे असलेले पालक समाजात दिसून येतात. याचा अर्थ आजचे शिक्षण म्हणजे केवळ माहिती गोळा करणे असा झालेले आहे. परंतू यामुळे मन क्रियाहीन होते व शिकण्याची कुवत नष्ट होते. व्यक्तिच्या ठिकाणी गोळा झालेले ज्ञानाचे भंडार खुप मोठे दिसत असले तरी अनुभवाला मर्यादा घालते. या उलट खरे शिक्षण अमर्याद असते. शिक्षणाबाबत प्राचिन संकल्पना वेगळी होती, सामान्यपणे लेखन, वाचन, पाठांतर, धार्मिक, सांस्कृतिक रीरिरीवाज इ. चे शिक्षण मुलांना घरीच मिळे. यावरून असे लक्षात येते की, शिक्षणाकडे पाहयाचा भारतीय दृष्टीकोन हा अधिकतम आध्यात्मिक आहे व आध्यात्मिकता हे भारताचे अंतरंग आहे.

देशातील नागरिकांमध्ये असलेल्या क्षमता व कौशल्य यात वाढ करून नागरिकांना अधिकाअधिक विकसीत करून त्यांच्या विकासासाठी पुरेपूर उपयोग करून घेणे हे मानव संसाधन विकासात आवश्यक आहे. अशा या मानव संसाधन विकास संकल्पनेचा उपयोग करून त्यांना माणूस म्हणून घडविणाऱ्या विचारांचे सामर्थ्य प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांमध्ये आढळून येते. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांमध्ये मानव संसाधन विकासास पूरक असे घटक आढळून येतात.

समस्या विधान :

''मानव संसाधन विकासाच्या दृष्टीकोनातून स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमावरील प्रभाव — एक विश्लेषण''.

संशोधनाची उद्दीष्टे :

१) स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारातून मानव संसाधन विकासाच्या घटकांचा शोध घेणे.
२) एन.सी.एफ.२००५ च्या दस्तऐवजातून मानव संसाधन विकासाच्या घटकांचा शोध घेणे.
३) स्वामी चिन्मयानंद यांच्या मानव संसाधन विकासाच्या घटकांचा नवीन अभ्यासक्रमावरील प्रभाव पडताळणे.
४) चिन्मय साधक व शिक्षणतज्ज्ञ यांच्या विचारातील सहसंबंध शोधणे.

संशोधनाची परिकल्पना :

स्वामी चिन्मयानंद यांचे मानव संसाधन विकास यावर आधारित विविध घटक व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मधील शैक्षणिक विचार यात सहसंबंध नाही.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्यापूरते मर्यादीत आहे.
२. प्रस्तुत संशोधन हे स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथ विचारापुरते मर्यादित आहे.
३. प्रस्तुत संशोधन हे चिन्मय मिशन पूरते मर्यादीत आहे.
४. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील National Curriculum frame work 2005 पुरते मर्यादित आहे.
५. प्रस्तुत संशोधन हे चिन्मय ग्रंथापुरते मर्यादित आहे.
६. प्रस्तुत संशोधन हे चिन्मय मिशनमधील आचार्य व शिक्षणतज्ज्ञ यांच्या पुरते मर्यादित राहील.

संशोधनाची पध्दती :

संशोधन कार्यामध्ये संशोधन पध्दतीला सर्वाधिक महत्व आहे. संशोधन कार्य करीत असतांना योग्य अशा संशोधन पध्दतीची निवड करणे आणि त्या पध्दतीचा वापर संशोधनामध्ये करणे गरजेचे आहे. संशोधनाच्या ज्या विविध पध्दती आहेत त्यापैकी प्रस्तुत संशेधनामध्ये गुणात्मक सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली, कारण यामध्ये प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यातून शिक्षण विषयक विचारांचा सर्वप्रथम शोध घ्यायचा आहे व ही बाब गुणात्मक तथ्यांशी निगडीत आहे. गुणात्मक संशोधन केवळ गुणात्मक तथ्ध्यांचेच संकलन करते असे नाही. प्रस्तुत संशोधनाचे जे उद्दिष्ट आहे, त्यात आधूनिक शिक्षण प्रणाली वरील प.पू. गुरूदेवांच्या विचारांचा प्रभावही पडताळून पहावयाचा आहे. गुणात्मक सर्वेक्षणातून शिक्षणामध्ये योगदानाला वाव मिळतो. प्रस्तुत संशोधनातून नविन शिक्षणाबाबतचा एक विस्तृत आराखडा हे संशोधनाचे योगदान आहे.

चिन्मय साधक व शिक्षण तज्ज्ञांकडून आलेल्या माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी तसेच अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला.

संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श :

प्रस्तुत संशोधनात शिक्षणतज्ञ, चिन्मय साधक व चिन्मय मिशन महाराष्ट्राचे आचार्य ह्यांचा समन्वय करण्यात आला आहे.

नमुना निवड :

१. संशोधन कार्यासाठी ४५० शिक्षण तज्ञांची निवड करण्यात अली, ह्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे — बी.एड. महाविद्यालयातील अधिव्याख्याता, डी.एड. अध्यापक विद्यालयातील अधिव्याख्याता, जेष्ठ शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी.
२. चिन्मय साधनकांची निवड करीत असतांना एकुण १०० चिन्मय साधकांची निवड करण्यात आली.
३. संशोधनासाठी महाराष्ट्रातील २० आचार्य व ब्रम्हचारी यांची निवड करण्यात आली. नमुना निवड ही सहजप्राप्त नमुना निवड पध्दतीने करण्यात आली आहे.

माहिती संकलनाची साधने

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन साधन म्हणून मतावली या संशोधन साधनाचा उपयोग केला.
१. चिन्मय साधकांसाठी मतावली
२. शिक्षण तज्ञांसाठी मतावली

माहिती संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन :

मतावलीच्या आधारे मिळालेल्या माहितीवरून सांख्यिकीय विश्लेष्ण, अर्थनिवर्चन करण्यात आले. चिन्मय साधक व शिक्षण तज्ज्ञांना देण्यात आलेल्या मतावलीचा सहसंबध खालील प्रमाणे आहे.

सारणी क्र. १ :

विवरण	शिक्षण		संस्कृती		मूल्य		सकारात्मक दृष्टीकोन		कौशल्य	
	तज्ज्ञ	साधक	तज्ज्ञ	साधक	तज्ज्ञ	साधक	तज्ज्ञ	साधक	तज्ज्ञ	साधक
असहमत	४०	२०	३८	१८	३५	१९	४०	२०	३०	२१
अंशत: सहमत	९०	३५	८८	३४	८५	३४	७०	३०	६०	२३
सहमत	३००	५०	२०४	५३	३१०	५२	३२०	५५	३४०	५५
r- factor	r = 0.92		r = 0.94		r = 0.92		r = 0.93		r = 0.92	

वरील सारणीवरून लक्षात येते की, तज्ज्ञांच्या आणि चिन्मय साधकांच्या शिक्षण विषयक संकल्पना, मूल्य सकारात्मक दृष्टीकोन आणि कौशल्य यांचा धनात्मक उच्चश्रेणीचा सहसंबंध लक्षात येतो. चिन्मय साधक आणि तज्ञांच्या विचारात सहसंबंध आहे.

वरील गणनेवरून सिध्द होते की, तज्ज्ञांच्या आणि चिन्मय साधकांच्या कौशल्य विषयक संकल्पनांच्या आधारे उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आहे. अशा प्रकारे प्रत्येक घटकाचे विश्लेषण केल्यानंतर ज्ञान, प्रवृत्ती, प्रेरणा, बांधीलकी, अभिरूची या संकल्पनांच्या आधारे उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आहे.

व्रील सर्व विधानांवरून असे आढळुन आले की, चिन्मय साधक व शिक्षणतज्ज्ञ यांच्या विचारात सहसंबंध आहे.

संशोधनाचे निष्कर्ष :

चिन्मय साधक व शिक्षण तज्ज्ञ यांच्यामधील शिक्षण या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळुन आला. चिन्मय साधक व शिक्षणतज्ञ यांच्यामधील संस्कृती या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळुन आला. चिन्मय साधक व शिक्षणतज्ज्ञ यांच्यामधील मूलय या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळून आला. चिन्मय साधक व

शिक्षणतज्ज्ञ यांच्यामधील सकारात्मक दृष्टीकेत या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळून आला. चिन्मय साधक व शिक्षणतज्ञ यांच्यामधील ज्ञान या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळून आला. चिन्मय साधक व शिक्षणतज्ञ यांच्यामधील क्षमता या संकल्पनेच्या मतामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळुन आला. संशोधनातील सर्व घटक यामध्ये उच्च श्रेणीचा धनात्मक सहसंबंध आढळून आला.

वरील अर्थनिर्वचनावरून असे लक्षात येते की, .

१. आधूनिक शिक्षण पध्दतीवर स्वामी चिन्मयानंदाच्या विचारांचा व संकल्पनांचा पगडा आढळतो.
२. स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यात मानव संसाधन विकासास आवश्यक घटक अभिव्यद्यक्त होतात.
३. आधूनिक काळात स्वामी चिन्मयानंदांच्या विचारांचे महत्व दिसून येते.
४. प.पू. स्वामी चिन्मयानंद यांनी विविध नवनवीन संकल्पना शिक्षण क्षेत्राला दिल्यात त्याचा उहापोह संशोधना अंतर्गत करण्यात आलेला आहे.
५. स्वामी विवेकानंद यांच्या साहित्यातून विविध शैक्षणिक तत्वे अभिव्यक्त होतात ही बाब संशोधनाच्या आधारे सिध्द झालेली आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. Swami Tejomayananda (2004). Right Thinking. Mumbai: Chinmaya Seva Trust, Maharashtra.
२. Nany Patchen (2006). Journey of Master Swami Chinmayananda. Mumbai: Chinmaya Seva Trust, Maharashtra.
३. Swamini Samvidananda (1006). Chinmay Vision Program. Mumbai : chinmaya Seva Trust, Maharashtra.
४. Bhanamati Rao (1996). Chinmaya centre of world understanding. Mumbai, Chinmaya Seva Trust, Maharashtra.
५. मुखोपाध्याय, मर्मर (२०१०). शिक्षणातील सर्वांगिण गुणवत्ता व्यवस्थापन, पुणे: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.